१ मे २०२०

प्रति,

मा. ना. श्री. नरेंद्र मोदी

पंतप्रधान

भारत सरकार, दिल्ली

विषय - कोवीद - १९ महामारीमुळे देशभर सुरू केलेल्या टाळेबंदीमुळे उद्‌भवलेल्या अडचणी व त्यावरील संभाव्य उपाययोजना.

आदरणीय महोदय,

कोवीद - १९ या विषाणूजन्य महामारीवर मात करण्यासाठी आपण केलेल्या उपाययोजनांची संपूर्ण जगभर दखल घेतली जात आहे त्याबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन. या अनपेक्षित आलेल्या आजारामुळे कल्पनातीत असे नुकसान झालेले आहे. जीवनाच्या प्रत्येक अंगाला या महामारीने स्पर्श केला आहे. आगामी काळात यातून बाहेर पडण्यासाठी व सर्वांच्याच मनात नवी उभारी निर्माण व्हावी यासाठी खालील उपाययोजना सुचवत आहोत.

१. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आर्थिक अडचणीवर मात करण्यासाठी उचललेले पाऊल अतिशय योग्य आहे. उद्योजकांना वेगळी सुरक्षितता न देता १० टक्के क्रेडीट लिमिट वाढवण्याचा निर्णय व त्याला टर्मलोनमध्ये परावृत्तीत करून १ वर्षाची मुदत मिळणे शिवाय व्याजात ४ टक्के सवलत मिळणे हा निर्णय योग्य आहे. तथापि मे महिन्याच्या पुढे टाळेबंदी सुरू करावी लागल्यास यात आणखीन १० टक्क्याची वाढ केल्यास ती उद्योगाला उभारी देईल.

२. बंद असणाऱ्या उद्योगांना वीजबिल, पाणी व विविध कर हे द्यावेच लागतात. उद्योजकांना कामगारांच्या पगारीपासून अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने वीजबिल, पाणी व विविध कर याची वसुलीची मुदत वर्षभरासाठी वाढवून दिली जावी.

३. प्रॉव्हीडंट फंडाच्या बाबतीत शासन जे योगदान देणार आहे त्यातील अटी शिथील करून छोट्या उद्योजकांनाही त्यात मदत व्हायला हवी. २५ कोटीपेक्षा अधिकची उलाढाल असणाऱ्या उद्योजकांपेक्षा कमी गुंतवणुकीत जे व्यवसाय करतात अशा लघु उद्योजकांना व्यवसाय उभारणीसाठी शासनाची मदत अत्यावश्यक आहे.

४. जगभरच्या उद्योजकात व भारतीय उद्योजकात एक मूलभूत फरक आहे. 'अंथरुण पाहून पाय पसरण्याची' आपल्याकडे पध्दत असल्याने 'अव्वाच्या सव्वा' खोटे आकडे तयार करून फसवणूक करणाऱ्यांचे प्रमाण अगदीच नगण्य आहे त्यामुळे उद्योजकांना टाळेबंदी उठल्यानंतर किमान सहा महिने शासन आपल्या पाठीशी आहे अशी स्थिती निर्माण झाली तर बहुतांश उद्योजक उभे राहतील. कर्ज उपलब्ध होणे, व्याजात सवलत मिळणे व ज्या खर्चाच्या बाबी चुकणार नाहीत त्याच्या वसुलीचा तगादा तातडीने मागे लागणार नाही याची काळजी घेणे या प्रमुख मुद्यात शासनाने लक्ष घातले पाहिजे.

५. यावर्षी उद्योगाची उलाढाल गतवर्षीच्या तुलनेत कमी होणार असल्याने आयकर व विक्रीकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अकारण उद्योजकांना त्रास होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

६. विविध प्रकारच्या परवान्यांची मुदत वाढवून दिली पाहिजे. आताच्या परिस्थितीचा विचार करून प्रदूषण, वजनमापे, कारखाने तपासणी व इतर तपासणी यंत्रणा अशा विविध खात्यांकडून अकारण उद्योजकांना त्रास होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

७. टाळेबंदी उठल्यानंतर नव्याने उद्योग सुरू व्हावेत यासाठी उद्योजकांना गुंतवणूक अनुदान दिले तर त्याचा नक्कीच लाभ

होईल व पुन्हा एकदा उद्योग उभारी घेतील.

८. कृषी व कृषी आधारीत उद्योग यावर अधिक भर आगामी काळात द्यावा लागणार असून ग्रामीण अर्थव्यवस्थेकडे आता वेगळ्या चष्म्यातून पाहण्याची गरज आहे. हवामान बदल हा केंद्रबिंदू मानून योजना करावी लागणार असून जगातून देशाकडे, देशातून शहराकडे व शहरातून खेड्याकडे असा उलटा प्रवास लोकांचा सुरू झाला आहे. प्रत्येक स्तरावर आपली काळजी करणारे सरकार आहे व ते आपल्याला वाऱ्यावर सोडत नाही असे वातावरण निर्माण करावे लागेल.

९. गावातच मजुरांच्या हाताला काम, शेतकऱ्यांचा शेतीवरील विश्वास वाढेल या पध्दतीचे वातावरण निर्माण करून शेतकरी उत्पादक कंपन्यांना अधिक महत्त्व देऊन ग्राहक व शेतकरी याचे थेट नाते जोडण्याचे काम करावे लागणार आहे.

१०. शेती, फळबाग, भाजीपाला यात शारीरिक अंतर ठेवून काम करता येऊ शकते त्यामुळे हे उद्योग तातडीने सुरू होतील. आगामी खरीप हंगामाच्या तयारीसाठी शेतकऱ्याला कोणत्याही स्तरावर अडचण येणार नाही, शेतकऱ्यांच्या बांधावरच खते, बी-बियाणे व सर्व निविष्ठा उपलब्ध व्हाव्यात.

११. शेती औजारे, उत्पादक व वितरक उद्योगांना टाळेबंदीतून सुट देऊन ती कामे गतीने केली जावीत.

१२. कोणे एकेकाळी भारत अन्नधान्याच्या सर्वच आघाड्यांवर स्वयंपूर्ण होता. आता खाद्यतेलाच्या बाबतीत आपले परावलंबित्व अधिक आहे. ही परावलंबिता दूर करण्यासाठी शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे अशी भावना शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाली तर डाळ उद्योगाप्रमाणे खाद्यतेलातही देश स्वयंपूर्ण बनेल. गरज आहे ती त्याच्या शेतमालाला योग्य हमीभाव मिळणे व बाजारपेठेत तो अडवला, नागवला जातो आहे त्याला प्रतिबंध करणे.

१३. महाराष्ट्र हा साखर उद्योगात आघाडीवर आहे. दुष्काळाचे चक्र सातत्याने येत असल्याने हा उद्योगही अडचणीत आहे. किमान पुढच्या वर्षी हा उद्योग नीट चालावा यासाठी या उद्योगासमोरील तांत्रिक अडचणी उभ्या न राहता हा उद्योग गतीने चालावा यासाठी शासनाचे सर्व स्तरावरील सहकार्य अपेक्षित आहे.

१४. कोवीद - १९ च्या प्रतिबंधक उपायासाठी केंद्र व राज्य सरकारच्या सूचनांचे तंतोतंत पालन करून या आपत्तीला सामोरे जाण्यासाठी आम्ही सर्व तयार आहोत. सरकार म्हणून आपणही आमच्या मागण्यांचा न्याय पध्दतीने विचार कराल याची आम्हाला खात्री आहे.

१५. आपला देश हा फुड बास्केट व्हावा यासाठी शेती व शेतीपूरक व्यवसायाकडे लक्ष द्यावे लागेल. कोल्डस्टोरेज हा शेती व्यवसायातील मोठा घटक आहे. याचा मुख्यत्वे लाभ धान्य, भाजीपाला, फळे, आईस्क्रीम, डेअरी प्रॉडक्ट अशा वस्तूंची साठवणूक करण्यासाठी होतो. संपूर्ण देशभर या व्यवसायाला मोठी मागणी आहे. आगामी काळात शेतकऱ्यांच्या मदतीसाठी या उद्योगाकडेही अधिक लक्ष द्यावे लागेल. शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेला माल कमीत कमी त्याची नासाडी व्हावी यादृष्टीने आपण रचना केली तर फळे, भाजीपाला क्षेत्रातील निर्यातीतही आपण वाढ करू शकू.

आपले

नॅचरल उद्योग समूह
रांजणी, ता. कळंब, जि. उस्मानाबाद
कीर्ती उद्योग समूह, लातूर
कलंत्री उद्योग समूह, लातूर
किसानमित्र वेअर हाऊस, कोल्डस्टोरेज लातूर
पाशा पटेल लातूर, श्रेणिक गांधी सीए लातूर